# उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, मालेगांव उपविभाग, मालेगांव, जि.नाशिक

दूरध्वनी क्रं.02554-253323 email Id- sdomalegaon2011@gmail.com


क्रं.फौज./पो.पा./काचि/ 815 /2023 मालेगांव, दि. 26 /12/2023

**पोलीस पाटील भरती प्रक्रिया संदर्भ** **महत्वाचे/तात्काळ**

**प्रति,**

1) समाधान अशोक शेवाळे, रा. मु. सावतावाडी, पो.वडनेर, ता.मालेगांव,
2) प्रमोद ज्ञानेश्वर बोरसे, रा. मु. सावतावाडी, पो.वडनेर, ता.मालेगांव,
3) प्रविण लहु जावरे, रा. मु.पो. रोंझाणे, ता.मालेगांव,
4) निकीता रमेश लांबोळे, रा. मु.पो. रोंझाणे, ता.मालेगांव,
5) कोमल दादाजी सुरंजे, रा.मु.पो. मळगांव, ता.मालेगांव,
6) बिजुनाथ पंडीतराव पवार, रा.मु.पो. मळगांव, ता.मालेगांव,
7) योगेश प्रल्हाद देसले, रा.मु.पो. काष्टी, ता.मालेगांव,
8) धनंजय रमेश गांगुर्डे, रा.गट नं.14, मु.पो. काष्टी मळा, ता.मालेगांव,

**विषय:-** पोलीस-पाटील रिक्त पदे भरती प्रक्रिया-2023
गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांचा गुणवत्ता क्रम निश्चित करणेकामी निवड समितीसमोर उपस्थित राहणेबाबत...

**संदर्भ:-**1) गृह विभाग, शासन निर्णय क्रं.बीव्हीपी 1113/1767/प्र.क्र.592/पोल-8, दि.22 ऑगस्ट, 2014,
2) उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, मालेगांव यांचेकडील पोलीस-पाटील भरतीबाबत जाहीरात क्रं.01/2023, दि.25 सप्टेंबर, 2023,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, पोलीस-पाटील रिक्त पदांची भरती प्रक्रिया-2023 ही उपविभागीय दंडधिकारी, मालेगांव, यांचे अध्यक्षतेखाली सुरु आहे. याबाबत संदर्भ क्रं.2 अन्वये दि.25 सप्टेंबर, 2023 रोजी रितसर जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे व त्यानुसार मालेगांव तालुक्यातील पोलीस-पाटील रिक्त पदे असलेल्या गावांकरिता इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन पोर्टलद्वारे अर्ज मागविण्यात आले होते. तद्नंतर दि.10/12/2023 रोजी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेअंती पात्र उमेदवारांची तोंडी परीक्षा घेण्यात आली आहे. सदर दोन्ही परीक्षेंचे एकुण गुणांची अंतिम गुणवत्ता यादी दि.22/12/2023 रोजी https://nashik.ppbharti.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तथापि, सदर अंतिम गुणवत्ता यादीमधील मौजे काष्टी, मौजे मळगांव, मौजे रोंझाणे व मौजे सावतावाडी, ता.मालेगांव येथील उमेदवारांना समान गुण मिळालेले आहे. संदर्भ क्रं.2 च्या जाहीरात क्रं.01/2023 मध्ये नमूद निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती मधील अट क्रं.20 मध्ये नमूद केल्याप्रमाणे समान गुण मिळाल्यास संदर्भ क्रं.1 च्या शासन निर्णयात दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार "गुणवत्ता यादीमधील दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवार समान गुण धारण करीत असतील, तर अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल:-

1. पोलीस पाटलांचे वारस; त्यानंतर
2. अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार; त्यानंतर

3. माजी सैनिक असलेले उमेदवार; त्यानंतर,

4. वयाने ज्येष्ठ उमेदवार.

पोलीस-पाटील रिक्त पद भरती-2023 मधील गुणवत्ता यादी मध्ये त्या-त्या गावाकरीता समान गुण मिळालेले उमेदवारांपैकी संदर्भ क्र.1 व 2 मध्ये नमूद केलेल्या अटी - शर्ती व मार्गदर्शक सुचनांच्या अधिन राहुन प्राधान्यक्रमाच्या आधारे एका उमेदवाराची अंतिम निवड करावयाची आहे.

यास्तव, आपण दि. 28/12/2023 रोजी सकाळी 11.00 वा. उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, मालेगांव येथे आपले वरील अट क्रं.20 मध्ये नमूद केलेली व आपली इतर कागदपत्रे (मूळ प्रतींमध्ये) घेवून उपस्थित रहावे.

SUB-DIVISIONAL MAGISTRATE
सब-डिव्हिजनल मॅजिस्ट्रेट, मालेगांव डिव्हिजन
MALEGAON DIVISION

(नितीन सदगीर)
**उपविभागीय दंडाधिकारी**
**मालेगांव उपविभाग, मालेगांव**

**प्रति**

1) मा.जिल्हाधिकारी नाशिक (गृह शाखा) यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
2) तहसिलदार, मालेगांव तथा सदस्य सचिव, पोलीस-पाटील पदभरती प्रक्रिया समिती,2023 यांचेकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना

2/- उपरोक्त पत्र सर्व संबंधित उमेदवारांना तात्काळ बजावून त्यांची दिनांकीत स्वाक्षरी पोहोच घेवून तसा बजावणी अंहवाल इकडेस सादर करावा.